<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३९९७/२०२२**</u>

निशाणी क्र. ३०

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब**

नाव – कांचन सचिन गायकवाड

वय – ४२ वर्षे धंदा – एच.डी.एफ.सी. मॅनेजर

रा. भोसरी, पुणे

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा सरतपास विधीज्ञ श्री.वाय.बी. पाटील**

आमच्या एच.डी.एफ.सी. बँकेमध्ये ध्रुव कंस्ट्रक्शन यांचे खाते आहे. सदरचे खाते आमचे बँकेतील जितेश शंकर भोईटे हे प्रोप्रा. म्हणून ऑपरेट करतात. मला न्यायालयाचे समन्स आले. त्याप्रमाणे मी सदर खात्याचे बँक स्टेटमेंट देखील आणलेले आहे. सदरचे बँक स्टेटमेंट मी न्यायालयात तयार आहे. त्यावर व्हेरीफाईड म्हणून माझी सही आहे. दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ मधील प्रकरणातील धनादेश क्र.९ रुपये २२,००,०००/– करीता बँकेत वटविणेकामी लावण्यात आलेला होता. सदरचा धनादेश अपुरी रक्कम या शे–यानिशी परत आलेला होता. बँक स्टेटमेंटवर माझी सही आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए.बी. मुळे यांचेमार्फत**

२. मी बँक स्टेटमेंट आजरोजी आणले असुन त्यासोबत ६५ बी चे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सदरचे प्रमाणपत्र मी पुढे दाखल करेन. प्रकरणातील धनादेश बॅकेत वटविणेकामी लावण्यात आला त्यावेळी मी त्या बँकेत कार्यरत होते. ध्रुव कंस्ट्रक्शन म्हणून फिर्यादीचे नावे केवळ एकच खाते आहे. हे म्हणणे खरे आहे की, बँक स्टेटमेंटवरुन सदरचे खाते ध्रुव कंस्ट्रक्शनचे कंपनीचे नावे आहे की पार्टनरशिप, प्रोप्रा. चे आहे हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँकेमध्ये क्लीअरींग डिपार्टमेंट वेगळे असल्याने प्रकरणातील धनादेश मी क्लीअरींग केलेला नाही.

३. ध्रुव कंस्ट्रक्शन चे खाते प्रोप्रा. म्हणून जितेश भोईटे हे ऑपरेट करतात हे मला माहिती आहे. त्या संदर्भात के.वाय.सी. देखील असते. मला साक्ष देणेकामी

न्यायालयाचे समन्स आल्यामुळे मी साक्ष देण्यास आले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत असुन मला या प्रकरणाबद्दल काहीही माहिती नाही.

उलटतपास संपला

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN

Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN Date: 2025.08.18 15:38:37 +0530

( एस.एस. चव्हाण )

दिनांक : १८/०८/२०२५

पिंपरी

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

पिंपरी, पुणे.